# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२


क्र. गो.वि/आस्था/2350/२०१६

दि. : 23/०९/२०१६

## परिपत्रक

**संदर्भ** :– शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण १११११/(प्र.क्रं.१०४/१६)/समन्वय ,मंत्रालय विस्तार भवन, मुबंई, दि. ३१ ऑगष्ट २०१६.

गोंडवाना विद्यापीठातील सर्व संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकानुसार शिक्षणाच्या माध्यमातून भावी पीढी निर्माण होत असते. अवयवदान नोंदणी कार्यक्रमाच्या आयोजनातुन सर्व स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये अवयव दानाचे महत्व या विषयी जागृती करणे आवश्यक आहे. याबाबत महाविद्यालयाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने अवयवदान जागृती कार्यक्रम राबविण्यात यावा व अभियानाच्या कार्यक्रमात युवा वर्ग सामील होण्याच्या दृष्टीने आयोजन करुन आपल्या स्तरावर अमलबजावणी करण्यात यावी.

**सहपत्र** :–
१ वरीलप्रमाणे शासनाचे परिपत्रक.

(डॉ. एस. एम. रोकडे)
कुलसचिव(कार्यकारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

अवयवदान जनजागृती करण्याबाबत
महा अवयवदान अभियान सन २०१६.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -१११६/(प्र.क्र.१०४/१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीखः ३१ ऑगस्ट, २०१६.

वाचा :- वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.जागृती-०७१६/ प्र.क्र.३२ / अधिनियम, दि.६ ऑगस्ट, २०१६

**शासन परिपत्रक** -

शिक्षणाच्या माध्यमातून भावी पीढी निर्माण होत असते. अवयव दानाच्या कार्यक्रमाच्या आयोजनातून सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाचे महत्त्व या विषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

२. या विभागाच्या अखत्यारीतील, महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना भरावयाच्या प्रवेश अर्जामध्ये मृत्यूपश्चात अवयव दान करण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात यावी. त्यानुसार इच्छुक दात्यांना अवयवदान नोंदणी अभियान कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात यावे. याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांकडून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने अवयवदान जागृती कार्यक्रम राबविण्यात यावा व अभियानाच्या कार्यक्रमात मोठया प्रमाणात युवा वर्ग सामील होण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

३. तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या संदर्भाधिन दि.६.८.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निदेशाप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०९०११३०१४०११०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.गो.चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. प्रधान सचिव, ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१३. निवडनस्ती/ समन्वय